
सकाळ पु. पा. न. १

# वसई चोरट्यांच्या रडारवर

## सर्वाधिक घरफोड्यांची नोंद, पोलिस आयुक्तालय क्षेत्रात वर्षभरात ५३९ घटना

वसई, ता. २७ (बातमीदार) : वसई-विरार मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत चोरट्यांचा सुळसुळाट वाढला आहे. आयुक्तालय क्षेत्रात वर्षभरात ५३९ घरफोडींच्या घटना घडल्या असून, सरासरी पाहता महिन्याला ४५ घरफोडी इतके प्रमाण आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ५८ अधिक घरफोड्या झाल्या आहेत. तर पोलिस आयुक्तालय कार्यालयातून मिळालेल्या आकडेवारीवरून वसई विरार शहरात घरफोडींचे प्रमाण वाढले असल्याचे स्पष्ट होत आहे.

वसई-विरार मिरा-भाईंदर शहरातील वाढते नागरिकीकरण पाहता येथे गुन्हेगारांचे प्रमाणही वाढत आहे. पोलिस आयुक्तालय कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, वालीव पोलिस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक ९९ घरफोडींच्या घटनांची नोंद झाली आहे.




यातील ५४ घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. तर विरार येथे ९५ पैकी ४७ गुन्हे उघड झाले आहेत. पेल्हार पोलिसांत ५३ गुन्हे दाखल आहेत. या आकडेवारीवरून वसई विरार शहरात घरफोडीचे प्रमाण वाढले असल्याचे स्पष्ट होत आहे. तर नागरिकांना सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**५८ घटनांनी प्रमाण वाढले**




**९९**
घरफोडीच्या घटनांची वालीवमध्ये नोंद

### मिरा रोड, उत्तनमध्ये सर्वाधिक कमी प्रमाण


मिरा रोड, उत्तन याठिकाणी प्रत्येकी ७ घरफोडी तर अर्नाळा सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत ८ घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. यापैकी १२ घरफोडीचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

नागरिकांनी घराबाहेर पडताना दागिने, पैशांची काळजी घ्यावी. तसेच जर कोणी संशयित आढळला तर नजीकच्या पोलिस ठाण्यात माहिती द्यावी. गृहसंकुलात सुरक्षा रक्षक नेमताना त्याची पूर्ण माहिती घ्यावी तसेच सीसीटीव्हीदेखील परिसरात लावावेत.
- बलराम पालकर, जनसंपर्क अधिकारी, पोलिस आयुक्तालय

CamScanner

लोकमत पा. न. ५

## वंचित बहुजन आघाडीचा एल्गार...



घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्ती युगपुरुषांचा सातत्याने अवमान करीत असून त्याविरोधात वंचित बहुजन आघाडीने अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर नेतृत्वाखाली मंगळवारी महामोर्चा काढला. (छाया : विशाल महाकाळकर)

लोकमत पा. न. ५

## अंगणवाडीच्या ताईंनीही दिली धडक....



मानधनात वाढ करण्यासहित विविध मागण्यांसाठी अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या वतीने मंगळवारी विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात जोरदार नारेबाजी केल्याने परिसर दणाणून गेला होता. (छाया : संजय लचुरिया)

CS CamScanner

लोकमत पा. न. २



तुनीषा शर्माच्या अंत्यसंस्काराच्यावेळी आईला शोक अनावर झाला.

# अभिनेत्री तुनीषा शर्मा हिच्यावर अंत्यसंस्कार

## मोठ्या संख्येने चाहतेही उपस्थित

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** दूरचित्रवाहिनीवरील मालिकेतील अभिनेत्री तुनीषा शर्मा हिच्या पार्थिवावर मंगळवारी भाईंदर पूर्वेच्या गोडदेव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. साश्रुनयनांनी तिला अखेरचा निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

अंत्यसंस्कारांवेळी तिच्या आत्महत्येस कारणीभूत म्हणून अटक केलेला आरोपी सहकलाकार शिजान खान याची आई व बहीणही उपस्थित होते. दरम्यान, तिचा मृत्यू गळफास घेतल्याने झाल्याचे जे. जे. रुग्णालयातील शवविच्छेदन अहवालात आल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.

कामण मार्गावर असलेल्या स्टुडिओच्या सेटवर शूटिंगदरम्यान तिने गळफास घेत आत्महत्या केली होती. प्रेमप्रकरण संपुष्टात आल्यानंतर नैराश्यातून तिने हे पाऊल उचलल्याचे सांगितले जाते.

तुनीषा हिचा मृतदेह शवविच्छेदनसाठी मुंबईच्या जे. जे. रुग्णालयात पाठवला होता. मंगळवारी दुपारी तिचे पार्थिव तिच्या घरी नेले. गोडदेव स्मशानभूमीत तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या मुलीला अखेरचा निरोप देताना तिची आई वनिता शर्मा यांना शोक अनावर झाल्याने त्या खाली कोसळल्या.

लोकमत पा. न. २

# शिजान खानला आज न्यायालयात आणणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अभिनेत्री तुनीषा शर्माच्या आत्महत्येप्रकरणी अटकेत असलेला आरोपी प्रियकर शिजान खान याला उद्या वालिव पोलिस वसई न्यायालयात हजर करणार आहेत.

तुनीषाने मालिकेच्या सेटवरील मेकअप रूममध्ये गळफास घेऊन शनिवारी दुपारी आत्महत्या केली होती. या घटनेनंतर पोलिसांनी प्रियकर शिजान खानला अटक केली होती. त्याला न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. त्याची कोठडी उद्या संपत असल्याने त्याला वसई न्यायालयात पुन्हा हजर करणार आहे. दरम्यान, दोन किंवा तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळण्याची शक्यता आहे.

### 'लव्ह जिहाद'चा अँगल नाही

तुनीषा ही 'अली बाबा' मालिकेचा को-स्टार शिजान खानसोबत काही काळापासून रिलेशनशिपमध्ये असल्याचीही माहिती पोलिसांनी दिली. ब्रेकअपनंतर तुनीषा अस्वस्थ होती. यामुळे २४ डिसेंबरला मेकअप रूममध्ये आत्महत्या केली. आतापर्यंत केलेल्या तपासात लव्ह जिहादचे एकही प्रकरण समोर आले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच शवविच्छेदन अहवालात तुनीषासोबत बळजबरीचे कोणतेही चिन्ह नाही.

CamScanner

लोकसत्ता पु. पा. ४

## विकास आराखडा हरकतींवर सुनावणीसाठी समिती

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहराच्या प्रारूप विकास आराखड्यावरील हरकतींच्या निवारणासाठी चार सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे सुनावणी प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. या आराखड्याविरोधात तीन हजारांहून अधिक हरकती दाखल झाल्या आहेत.

मीरा-भाईंदर महापालिकेचा प्रारूप विकास आराखडा ठाण्याच्या नगररनचा विभागाकडून आराखडा २८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. या आराखड्यावर हरकती नोंदवण्यासाठी २८ नोव्हेंबरपर्यंत मुदत होती. त्यानुसार अखेरच्या दिवसापर्यंत एकूण तीन हजार १०० इतक्या हरकती नोंदवण्यात आल्या आहेत.

या हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी निवृत्त सहसंचालक, निवृत्त साहाय्यक संचालक, पर्यावरण नियोजनकार साहाय्यक नगररचना संचालक (ठाणे) अशा चार जणांची समिती नुकतीच स्थापन केली आहे. मात्र, सुनावणीकरिता प्राप्त हरकतींची नोंद घेण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यामुळे आराखड्यावरील हरकतींवर पुढील महिन्यात सुनावणी घेण्यात येणार आहे, अशी माहिती ठाण्याच्या नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक किशोर पाटील यांनी दिली. या सुनावणीनंतर समितीचा अभिप्राय राज्य शासनाला सादर केला जाणार आहे. त्यानंतर अंतिम आराखडा प्रसिद्ध केला जाणार आहे.

लोकसत्ता पु. पा. ४

## भाईंदरमध्ये डिजिटल नामफलकावर अश्लील मजकूर

**भाईंदर :** मीरा-भाईंदरच्या आमदार गीता जैन यांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या हायमास्ट दिव्याच्या डिजिटल नामफलकावर अश्लील मजकूर झळकल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

भाईंदर पूर्वेला रेल्वे स्थानक येथील बंदरवाडी परिसरात रात्री दाट अंधार होत असल्यामुळे तेथे हायमास्ट दिवा उभारण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार जैन यांनी आपल्या निधीतून नुकताच तेथे हायमास्ट दिवा लावला आहे. या दिव्याजवळ डिजिटल नामफलक उभारण्यात आले होते, मात्र या नामफलकावर १६ डिसेंबर रोजी अश्लील मजकूर प्रसिद्ध झाल्याने खळबळ उडाली आहे. जैन यांनी आपले स्वीय साहाय्यक राजेश बरकडे यांच्यामार्फत नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीनुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई यांनी दिली.

लोकमत पा. नं. 2

## नालासोपाऱ्यात महिलेचा विनयभंग

**नालासोपारा :** नालासोपारा येथे २७ वर्षीय विवाहित महिलेचा विनयभंग करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. शहरात राहणारी विवाहित महिला सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास घरात स्वयंपाक करत असताना, परिसरातील ओळखीच्या तरुणाने ती एकटी असल्याचा फायदा घेत विनयभंग केला. आरोपीला प्रतिकार करणाऱ्या महिलेला तरुणाने मारहाण केली होती. पीडित महिलेने सोमवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा. न. २

## अल्पवयीन मुलाचे झाले अपहरण

**नालासोपारा :** नायगावच्या वाकीपाडा परिसरात राहणाऱ्या १४ वर्षाच्या अल्पवयीन मुलाचे सोमवारी सकाळी अपहरण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. घटनेच्या दिवशी तो शाळेत जाऊन येतो असे सांगून तो घराबाहेर पडला पण तो घरी परतलाच नाही.

CamScanner

पुढारी - पा.नं. ३

# पाकिस्तानी एनेमी प्रॉपर्टीची परस्पर विक्री

## १९७१ मध्ये जमीन मालकाच्या मृत्युनंतर २००७ मध्ये जमिनीची विक्री

भाईंदर : राजू काळे

मिरा-भाईंदर शहरातील मौजे काशी व घोडबंदर येथील सुमारे ३ हेक्टर २० गुंठे जमीन पाकिस्तानमधील एका नागरीकाची असल्याचे समोर आले असून या नागरीकाचा ७ जून १९७१ रोजी पाकिस्तानमधील कराची येथे मृत्यू झाला. हि जागा केंद्र सरकारच्या एनेमी प्रॉपर्टी विभागाची असताना या विभागाला अंधारात ठेवून जमिनीची खरेदी-विक्री करारनामा मयत व्यक्तीने दिलेल्या पॉवर अॅटर्नीद्वारे २००७ मध्ये ठाणे येथील उपनिबंधक २ कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आला. या जागेवर सध्या बांधकाम सुरु करण्यात आल्याने याची गंभीर दखल केंद्रीय तपास यंत्रणेकडून घेण्यात यावी व संबंधितांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी होऊ लागली आहे.

शत्रू राष्ट्रातील एखाद्या नागरीकाची जमीन भारतात असेल तर ती सरकार दरबारी एनेमी प्रॉपर्टी (शत्रू मालमत्ता) म्हणून जमा होते. त्याचा वापर वा कोणताही व्यवहार नियमानुसार सरकारलाच करता येतो. याखेरीज इतरांना त्याचा कोणताही व्यवहार परस्पर करता येत नाही. तसा कायदाच केंद्र सरकारने १९६८ मध्ये अंमलात आणला आहे. मात्र अशाच एका जमिनीच्या सातबाऱ्यात फेरफार करून ती संबंधितांनी परस्पर विकासकाला विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.आहे. यात ती जमीन स्वत:च्या नावे करणाऱ्यांसह सरकारी अधिकारी देखील सामील असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारताची १९४७ मध्ये फाळणी झाली आणि भारत व पाकिस्तान देशाची निर्मिती झाली. यावेळी भारतातील अनेक मुस्लिम पाकिस्तानात गेले. त्याच वेळी मिरा-भाईंदर मधील काशी गावात राहणारे मैनुद्दीन निजामुद्दीन पटेल व त्यांचे भाऊ हुसेनिया निमामुद्दीन शेख यांचे कुटूंब सुद्धा पाकिस्तानात गेले. पटेल यांनी आपल्या नावे असलेली मौजे काशी येथील सर्व्हे क्रमांक ६, ५, १८, २१, २२, १४, १, १९, ३ व मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्रमांक १०६ वरील ३ हेक्टर ७ एकर २० गुंठे जमीन भारतात सोडून पाकिस्तानात कायमस्वरूपी वास्तव्य करणे पसंत केले. त्यांची हि जमीन केंद्र शासनाच्या एनेमी प्रॉपर्टी कायद्यानुसार सरकारकडे जमा झाली. सध्या या जागेची मालकी केंद्र सरकारची असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय गृहविभागांतर्गत समिती स्थापन करण्यात आली आहे.

या जमिनीचे मालक मैनुद्दीन पटेल यांचे पाकिस्तामधील




कराचीमध्ये ६ सप्टेंबर १९७१ रोजी निधन झाले. यानंतर पटेल यांचे कराचीमधीलच नातेवाईक फातिमा मैनुद्दीन पटेल, रेहाना नासीर अहमद पटेल, मोहम्मद इरफान पटेल, मोहम्मद गुफरान पटेल, मोहम्मंद रिझवान पटेल, झैनब गुलाम, मैनुद्दीन पटेल आदींनी पाकिस्तानमधील इम्रान मैनुद्दीन पटेल यांना ९ जुलै २००७ रोजी त्या जमिनीची पॉवर ऑफ ऍटर्नी पाकिस्तानमध्येच नोंदणीकृत करून दिली. हि पॉवर ऑफ ऍटर्नी घेऊन इम्रान पटेल हा २००७ मध्ये भारतात आला. त्याने केंद्र सरकारच्या एनेमी प्रॉपर्टी विभागाला कोणताही थांगपत्ता लागू न देता पटेल यांची जमीन आसीफ पटेल, रिझवान पटेल, नूर मोहम्मद पटेल, सिकंदर पटेल यांच्याशी संगनमत करून मेसर्स ए. ए. कॉर्प या स्थानिक कंपनीला परस्पर विकली. त्यावेळी विक्रीचा व्यवहार हवाला मार्गाने करण्यात आल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. कारण त्याची कोणतीही पोचपावती अथवा देवाण-घेवाणाची नोंद करारनाम्यात करण्यात आलेली नाही.

### पॉवर ऑफ ऍटर्नीच्या आधारे करारनामा नोंदणीकृत

हा करारनामा ठाणे येथील उपनिबंधक २ कार्यालयात ७ सप्टेंबर २००७ रोजी नोंदणीकृत करण्यात आला. त्यावेळी जमिनीचे मालक उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र त्यांच्या पॉवर ऍटर्नीच्या आधारे करारनामा नोंदणीकृत करण्यात आला. या जागेवर बांधकाम करण्यासाठी पालिकेने देखील परवानगी दिली असून त्याआधारे त्या जमिनीवर विकासकाने बांधकाम सुरु केले आहे. या बांधकामापूर्वी ए.ए. कॉर्प कंपनीने संबंधितांसोबत २०१२ मध्ये विकास करारनामा केला. या कंपनीचे भागीदार शहरातील नामी बिल्डर असून त्यांचे बड्या अधिकाऱ्यांसह राजकीय नेत्यांशी हितसंबंध असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे याप्रकरणाची दखल केंद्र सरकारकडून घेतली जाईल का, असा प्रश्न उपस्थित झाला असला तरी याविरोधात ईडी व एनआयएकडे तक्रार करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

### देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

शत्रू राष्ट्रातील नागरीकाची जमीन केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत एनेमी प्रॉपर्टी म्हणून नोंद असताना जमिनीचा परस्पर व्यवहार करून एकप्रकारे देशाची तसेच केंद शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधितांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होऊ लागली आहे.

### स्वाक्षरी घेण्यासाठी भारताचे स्टॅम्प पेपर नेले पाकिस्तानमध्ये

विशेष म्हणजे जमीन विक्रीचा व्यवहार करण्यासाठी मयत मैनुद्दीन पटेल यांची स्वाक्षरी घेण्यासाठी भारताचे स्टॅम्प पेपर पाकिस्तानमध्ये नेण्यात आले. तसेच २००७ मध्ये इम्रान पटेल भारतात आला त्यावेळी इम्रान पटेल भारतात कसा काय आला. त्याच्याच दोन वर्षानंतर हॉटेल ताज व मुंबईमध्ये दहशतवादी हल्ला झाला. त्यामुळे या जमिनीचा हवाला मार्गे झालेल्या व्यवहारातील रकम् त्यासाठी वापरली किंवा नाही, याचा तपास होणे देखील आवश्यक असल्याचे मत व्यक्त होऊ लागले आहे.

CamScanner

महाराष्ट्र टाइम्स पा. नं. १

# सत्तारांच्या राजीनाम्यावर विरोधी पक्षाचे मौन

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नागपूर**

महसूल राज्यमंत्री असताना अब्दुल सत्तार यांनी वाशीम जिल्ह्यातील १५० कोटी रुपये किमतीची गायरान जमीन एका खासगी व्यक्तीला बेकायदा बहाल केल्याचा आरोप करत, त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विधानसभेचे कामकाज रोखून धरणाऱ्या विरोधी पक्षाने मंगळवारी या मुद्द्यावर मौन पाळल्याचे दिसून आले. विरोधी पक्षाने सत्तार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर अवाक्षरही न उच्चारल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सोमवारी सत्तार यांचे गायरान जमीन वाटपाचे प्रकरण काढून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. सत्तार यांच्या या निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ताशेरे ओढल्याचे सांगत, विरोधी पक्षाने दोन्ही सभागृहाचे कामकाज रोखून धरले. यावेळी झालेल्या गोंधळामुळे विधानसभेचे कामकाज तीन वेळा तहकूब होऊन नंतर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले होते. त्यामुळे मंगळवारी प्रश्नोत्तराच्या तासानंतर किंवा सीमाप्रश्नी ठराव झाल्यानंतर विधानसभेत सत्तार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जाईल, असा अंदाज होता. मात्र, कृषिमंत्री अब्दुल सत्तार सभागृहात असूनही विरोधी पक्षाने त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीबाबत अवाक्षरही काढले नाही. त्यामुळे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्यात समझोता झाल्याची चर्चा दिवसभर रंगली.

### गायरान जमीन घोटाळ्याचा आरोप



### विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन

महाविकास आघाडीच्या आमदारांनी मंगळवारी सत्तार यांच्या विरोधात विधान भवनाच्या पायऱ्यांवर अनोखे आंदोलन केले. शेतकरी हैराण, सरकार खातो गायरान... खोके लुटा कधी गायरान लुटा... भूखंड घ्या, कुणी गायरान घ्या... भूखंडाचे श्रीखंड खाणारे राजीनामा द्या... अशा घोषणा देत विरोधी पक्षाच्या आमदारांनी सरकारविरोधात आंदोलन केले. यात आघाडीतील ज्येष्ठ नेते सहभागी झाले होते.

### आरोप करणारे किती शुद्ध? : बावनकुळे

**नागपूर :** विरोधकांमधील काही जणांवर सत्तर हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. जे कायदा आणि सुव्यवस्थेबाबत आत्ता बोलत आहेत त्यांनी मंत्री असताना स्वतःच्या बंगल्यावर आणून नागरिकाला मारहाण केली होती. हे सारे पाहता भ्रष्टाचाराचा आरोप करणारे स्वतः किती शुद्ध आहेत? असा प्रश्न भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित केला.

### माझ्यावरील आरोप पूर्ण खोटे : देसाई

**नागपूर :** 'उद्धव ठाकर गटाचे आमदार अनिल परब यांनी माझ्यावर काही आरोप केले आहेत. ते पूर्णतः खोटे आहेत. मी कुठल्याही चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे,' असे उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना मंगळवारी सांगितले. परब यांनी देसाई यांच्यावर शेतजमीन व घरखरेदी संदर्भात आरोप केले आहेत. ➤ वृत्त...५

पुढारी पा. नं. २

# मुख्यमंत्र्यांच्या कानपिचक्यांनंतर मिटकरींची माफी

**नागपूर : पुढारी वृत्तसेवा**



राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मिटकरी यांना मंगळवारी विधान परिषदेत सत्ताधारी आमदारांच्या संतापाचा सामना करावा लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दलच्या वादग्रस्त ट्विटचा संदर्भ दिल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मिटकरी यांची चांगलीच शाळा घेतली. देशाच्या पंतप्रधानांबाबत बोलताना भान ठेवले पाहिजे. आपली कुवत काय, त्यांची कुवत काय हे बघितले पाहिजे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी मिटकरींना सुनावले.

पंढरपूर कॉरिडॉरसंदर्भातील लक्षवेधी सूचनेदरम्यान मिटकरी यांनी पंतप्रधान मोदी यांच्याविरोधातील सुब्रह्मण्यम स्वामी यांचे वादग्रस्त ट्विट सभागृहात वाचून दाखविले. त्यावर सत्ताधारी बाकांवरील आमदारांनी तीव्र आक्षेप घेत मिटकरी यांच्या दिलगिरीची मागणी केली. यावर, उपसभापतींनी हा उल्लेख पटलावरून काढल्याचे सांगत एकनाथ खडसे यांनी मिटकरी यांची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला. त्याने सत्ताधारी आमदार आणखी संतापले. या गदारोळात सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब झाले.

त्यानंतर सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू होताच मिटकरी यांचे विधान निंदाजनक आहे, असे शिंदे म्हणाले. तसेच, एकनाथ खडसे आपण ज्येष्ठ सदस्य आहात. आपण अशा वक्तव्यांचे समर्थन करता कामा नये, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी खडसे यांनाही सुनावले. त्यानंतर, उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी मिटकरी यांचे विधान पटलावरून काढून टाकले. तर, माझ्या विधानामुळे जर सभागृहाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असे मिटकरी म्हणाले.

CamScanner

लोकसत्ता पा. न. १

## कर्नाटकचा निषेध : विधिमंडळात एकमताने ठराव मंजूर

# सीमाभाग महाराष्ट्राचाच !

**संजय बापट, लोकसत्ता**



**नागपूर :** कर्नाटक सरकारच्या मराठीविरोधी भूमिकेचा तीव्र निषेध करीत बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर या शहरांसह ८६५ गावांतील इंचन् इंच जमीन महाराष्ट्राचीच असल्याचा ठराव मंगळवारी विधिमंडळात एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावाद्वारे महाराष्ट्राने कर्नाटकला जशास तसे उत्तर दिले.

सीमाभागातील एक इंचही जमीन महाराष्ट्राला देणार नाही, अशी भूमिका घेत कर्नाटक विधानसभेत गेल्या आठवड्यात महाराष्ट्राविरोधात ठराव करण्यात आला होता. त्यास प्रत्युत्तर म्हणून राज्य विधिमंडळात ठराव करून, त्यात सीमाभागातील इंचन् इंच जमीन महाराष्ट्राचीच असल्याचा पुनरुच्चार करण्यात आला. सीमाप्रश्नी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर झालेल्या बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा आग्रह धरावा आणि सीमाभागातील मराठीजनांच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत कर्नाटक सरकारला समज द्यावी, अशी मागणी ठरावाच्या माध्यमातून केंद्राकडे करण्यात आली आहे.

''सीमाभागातील बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर या शहरांसह ८६५ गावांतील मराठी भाषक जनतेबरोबर महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने आणि सर्व ताकदीनिशी उभे आहे. केंद्र शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन महाराष्ट्र राज्याच्या न्याय्य मागण्यांसाठी मराठी भाषिक खेडे, घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषक जनतेची सापेक्ष बहुसंख्यता आणि महाराष्ट्रात समाविष्ट होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्वानुसार महाराष्ट्राला साथ द्यावी'', असे ठरावात म्हटले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलेला ठराव सभागृहातील दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी बाके वाजवत एकमताने मंजूर केला. या ठरावात सीमाभाग केंद्रशासित करण्याचा समावेश करावा, अशी **(पान ९ वर)**

### 'फेरविचार याचिका दाखल करा'



"महाराष्ट्र- कर्नाटक सीमाभाग केंद्रशासित करता येणार नाही. परिस्थिती जशीच्या तशी ठेवावी", असे निर्देश काही वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिले होते, याकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. त्याचा संदर्भ देत, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल करण्याची मागणी सभागृहाबाहेर पत्रकारांशी बोलताना केली. "कर्नाटक सरकार न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत नाही. कर्नाटक सरकार अत्यंत आक्रमकपणे एक-एक पाऊल पुढे टाकत आहे. आपल्या डोळ्यादेखत तिथला मराठी ठसा पुसला जाईल आणि तसे होऊ नये, यासाठी फेरविचार याचिका दाखल करण्याची आवश्यकता ठाकरे यांनी व्यक्त केली.

पुढारी पु. पा. न. ३

## वसई, विरारमध्ये धोकादायक इमारतींचे संकट

**वसई: पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा येथे रविवारी दुपारी एका इमारतीचा सज्जा कोसळण्याची घटना घडली होती. या घटनेत जीवितहानी झाली नसली तरी या घटनेच्या निमित्ताने शहरातील धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला आहे. शहरात १२४ इमारती अतिधोकादायक असून ५४५ इमारती धोकादायक आहेत. यातील बहुतांश इमारती या रिकाम्या करून दुरुस्ती करण्याच्या आहेत. यामुळे हजारो कुटुंबांवर मृत्यूची टांगती तलवार कायम आहे.

नालासोपारा पूर्वेच्या तुळींज परिसरातील असलेल्या साई निवास या इमारतीचा सज्जा रविवारी सकाळी कोसळला. यावेळी या वरांड्यात कुणी नसल्याने जिवीतहानी टळली. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर २१ सदनिका तर तळमजल्यावर १० सदनिका आहेत. शहरात अनधिकृत इमारती आणि चाळींची संख्या झपाट्याने वाढत आहे. शहराचे नियोजन कोलमडत असून नागरी सोयीसुविधांवर ताण पडत असतो. बांधकामांचा दर्जा निकृष्ट असल्याने या इमारती आणि चाळी अवघ्या काही वर्षांत धोकादायक बनू लागल्या आहेत. इमारतींच्या भींतींना तडे गेलेले असतात, भींती भुसभुशीत होऊन माती पडत असंते, बांधकामावरील प्लास्टर निघत असते. रहिवाशांना सतत डागडुजी आणि दुरुस्ती करावी लागत असते. मात्र इमारतीच्या बांधकामाचा मूळ साचाच खिळखिळा असल्याने डागडुजी आणि दुरुस्ती मलमपट्टी ठरत असते. रहिवाशांना भितीच्या छायेत राहावे लागते.

CamScanner

पुण्य नगरी पा.न. २

# महापुरुषांच्या अवमानप्रकरणी खडाजंगी

## दानवेंनी निषेधाची मागणी करत वेधले सभागृहाचे लक्ष

**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आदी महापुरुष महाराष्ट्राचे दैवत असून प्रत्येकाच्या मनामध्ये त्यांच्याबद्दल आस्था आहे. अशा महापुरुषांबाबत अवमान करणारी वेगवेगळी वक्तव्य राज्यातील जबाबदार व सत्ताधारी व्यक्तींच्या माध्यमातून झाली असल्याचे सांगत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महापुरुषांचा अवमान केल्याप्रकरणी निषेध करण्याची मागणी लावून धरली.

राज्यातील सत्ताधारी मंडळींकडून राज्यातील महापुरुषांचा अवमान झाल्याच्या घटना घडल्या. यावर दानवे यांनी २८९ अन्वये चर्चेची मागणी केली. यात शशिकांत शिंदे, अनिल परब यांनी सहभाग घेतला. तर याला सत्ताधाऱ्यांकडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले. दानवे म्हणाले, गेल्या काही दिवसांत राज्यातील सत्ताधाऱ्यांकडून महापुरुषांबाबत सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये करण्यात आली. राज्यपाल सांगतात, छत्रपती शिवाजी महाराज आता जुने आदर्श झाले. ते महात्मा फुले व सावित्रीबाई यांच्याविषयी


(छाया : दीपक साळवी)

वादग्रस्त वक्तव्य करतात. शिवरायांच्या प्रति वेगवेगळे कोलंबस या महाराष्ट्रात निर्माण झालेले असून त्यांनी वेगवेगळे शोध त्यांच्या प्रति लावलेले आहेत. छत्रपती शिवरायांचा जन्म कुठे झाला, याविषयीचा शोध नवीन कोलंबसांनी लावला. छत्रपती शिवरायांची आग्र्याहून सुटकेची तुलना ही एका मंत्र्यानी राज्यातील सत्ताबदलाच्या प्रकाराशी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी भीक मागून शाळा सुरू केली, अशा प्रकारचे वक्तव्य संसदीय कामकाज मंत्र्यांनी केले. केंद्रातील भाजप प्रवक्ते यांनी शिवरायांनी पाच वेळा माफी मागितली, अशी वेगवेगळी वादग्रस्त वक्तव्ये निषेधार्ह असल्याचे दानवे म्हणाले. महापुरुषांच्या या अवमानप्रकरणी नियम २८९ अन्वये चर्चा करत असताना सत्ताधाऱ्यांनी सविस्तर चर्चा होऊ दिली नाही. या चर्चेमध्ये सत्ताधाऱ्यांना स्वारस्य नसून वेगवेगळ्या पद्धतीने स्वतःचा बचाव करून जुने मुद्दे काढण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांनी केल्याचा आरोप दानवे यांनी केला.




## उपमुख्यमंत्री फडणवीसांकडून विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर

**नागपूर :** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यासह सत्ताधारी नेत्यांकडून महापुरुषांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी भाजपवर मोठ्या प्रमाणात टीका झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या टीकेला मंगळवारी विधान परिषदेत विरोधकांवर निशाणा साधत जोरदार प्रत्युत्तर दिले.

फडणवीस म्हणाले, खासदार संजय राऊत यांच्या आईला जिजाऊंची उपमा दिली जाते, तर शरद पवारांना विठ्ठलाची उपमा दिली जाते. ही तुलना योग्य आहे का? महापुरुष आणि विठ्ठलाची तुलना होऊ शकते का? परंतु शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे लोक ही तुलना करतात, परंतु खरेच अशी तुलना होऊ शकते का? हा संत, देवांचा अपमान नाही का? रेड्याला शिकवण्याचे सामर्थ्य आहे म्हणून संतांचा चमत्कार म्हणता, तर सामान्य माणसांना का



शिकवले नाही, असे म्हणत नामदेव महाराजांचा अपमान करीत कुत्र्याला दूध देतात, पण माणसांना देत नाही, असे वक्तव्य आले त्याचा निषेध कोणी केल्याचे दिसले नाही. कृष्ण आणि भगवान राम यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्यावर 'मविआ'चे लोक काहीच बोलत नाहीत, गप्प बसतात, असे सांगत फडणवीस यांनी विरोधकांच्या दुटप्पी भूमिकेवर बोट ठेवले.

शिवसेनेच्या एका नेत्याने शिवरायांच्या चेहऱ्यावर आदित्य ठाकरेंचा फोटो लावून 'रयतेचा राजा शिवबा माझा' असे ग्राफिक्स तयार करून सोशल मीडियावर शेअर केले. छत्रपतींच्या जन्मस्थानाबद्दल बोलले तर चूक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मस्थळाबद्दल जर चुकीचे वक्तव्य आले, तर त्यावर काहीच बोलले जात नाही. महाराण्या पायलीच्या पन्नास आहेत, राजमाता उसाच्या मळ्यात फुटाफुटावर आहेत, असे अनिल गोटे म्हणतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांना राहुल गांधी हे माफीवीर म्हणतात आणि त्यांच्या गळ्यात गळे घालून स्वतःला हिंदुत्ववादी म्हणणारे काहीच बोलत नाहीत. सावरकरांना भारतरत्न मिळाला नाही तरी चालेल, पण किमान त्यांचा अपमान थांबवा. सावरकरांबद्दल आणखी काय काय बोलले गेले, असे सांगत फडणवीस यांनीही विरोधकांना आरसा दाखवण्याचे काम केले.

CamScanner

लोकसत्ता पु. पा. न. १

## दीड वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष

# पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या 'ऑडिओ रेकॉर्डिंग'कडे पाठ

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील सर्व पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत, परंतु या कॅमेऱ्यांमध्ये 'ऑडिओ रेकॉर्डिंग' ही यंत्रणा नसल्याचे उघडकीस आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये ऑडिओ रेकॉर्डिंग यंत्रणा असणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरीही त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

मीरा-भाईंदर शहरात एकूण ६ पोलीस ठाणे आहे. दोन वर्षांपूर्वीच येथील पोलीस ठाण्याचा समावेश हा ठाणे ग्रामीण क्षेत्रातून वगळून मीरा भाईंदर वसई -विरार पोलीस आयुक्तालयाअंतर्गत करण्यात आला आहे. तेव्हापासून या पोलीस ठाण्यात विविध उपक्रम राबवले आहेत आहेत. यात महत्त्वाचे म्हणजे 'एक कॅमेरा शहरासाठी' या उपक्रमास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अशा परिस्थितीत याबाबत दुर्लक्ष होत आहे.

केंद्रीय व राज्य तपास यंत्रणेच्या कार्यालयात सीसीटीव्हीसह ऑडिओ रेकॉर्डिंग यंत्रणा लावण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर २०२० मध्ये दिले होते. सीसीटीव्ही व ऑडिओ रेकॉर्डिंगमुळे तपास यंत्रणेकडे येणाऱ्या नागरिक, पीडित आणि आरोपींना सौजन्याची वागणूक मिळून अन्याय व गैरप्रकार कमी होतील अशी अशा होती. त्यानुसार मीरा-भाईंदर शहरातील सर्व पोलीस ठाण्यात हे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत, परंतु यामध्ये 'ऑडिओ रेकॉर्डिंग' यंत्रणा नाही.

यासंदर्भात माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी पोलीस महासंचालकांना तक्रार केली होती. जून महिन्यात पोलीस ठाण्यात कॅमेऱ्यामध्ये ऑडिओ यंत्रणेचीदेखील सोय करून दिली जाणार असल्याचे आश्वासन लेखी स्वरूपात दिले होते. त्याला सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होत असतानादेखील कोणत्याही स्वरूपाचे पाऊल उचलले जात नसल्याचे आरोप कृष्णा गुप्ता यांनी केले आहेत.

### कानाकोपऱ्यात सीसीटीव्ही हवेत



सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात पोलीस ठाण्यातील सर्व कानाकोपऱ्यात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर असणे बंधनकारक करण्यात आले होते, परंतु तरीदेखील केवळ तक्रार नोंदणी विभाग आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचे कार्यालय वगळता इतर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे अन्य पोलीस अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये गैरप्रकार प्रकार घडून येण्याची दाट शक्यता असल्याचे आरोप कृष्णा गुप्ता यांनी केले आहेत.

> **" पोलीस ठाण्यात लावण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ऑडिओ रेकॉर्डिंग यंत्रणा बसवण्याचे काम राज्य शासनामार्फतच केले जात आहे. त्यानुसार मीरा भाईंदर शहरातील पोलीस ठाण्यातदेखील ते बसवण्यात आले असावेत. जर ते बसवण्यात आले नसतील तर त्याची सविस्तर माहिती घेतली जाईल.**
>
> **- प्रकाश गायकवाड,** - उपायुक्त, मुख्यालय, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.

---

लोकसत्ता पु. पा. न. १

### घरातील सामानावर डल्ला; चौघांना अटक

**वसई :** घरातील सामान हलवण्याच्या (शिफ्ट करण्याच्या) कंपनीचे कर्मचारी बनून सामानावर डल्ला मारणाऱ्या टोळीतील चौघांना वसई पोलिसांनी अटक केली आहे. या टोळीने बनावट कंपनी स्थापन केली होती. 'जस्ट डायल', 'लॉजिस्टीक मार्ट' अशा प्रसिद्ध कंपन्यांकडून ग्राहकांचे संपर्क क्रमांक मिळवून ते फसवणूक करत होते. वृत्त...४

---

लोकसत्ता पु. पा. न. ४

### महिलेचा विनयभंग

**वसई :** भाईंदर येथे राहणारी तक्रारदार महिला सोमवारी रात्री महामार्गावरील किंग्ज रिसॉर्टमधून घरी परतण्यासाठी रिक्षात बसली होती. मध्यरात्री १२.३० च्या सुमारास रिक्षात बसलेला सहप्रवासी आणि रिक्षाचालकाने चाकूचा धाक दाखवून तिच्याकडील अडीच हजारांची रक्कम लुटली आणि विनयभंग केला. याप्रकरणी काशिमिरा पोलिसात दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

---

लोकसत्ता पु. पा. न. ४

### मुलीवर अत्याचार

**वसई :** नालासोपाऱ्यात एका १३ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करण्यात आला आहे. ही मुलगी गर्भवती राहिल्यानंतर तपसाणीसाठी नालासोपारा पूर्वेच्या मनमोहन इमर्जिक केंद्रात आली होती. तेव्हा हा प्रकार लक्षात आला. मात्र पीडित मुलगी तक्रार न देता केंद्रातून निघून गेली. याबाबत रुग्णालयाचे डॉक्टर लोचन पाटील यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पेल्हार पोलीस ठाण्यात अनोळखी आरोपीविरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

लोकमत



वसई गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून तीन गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळवले आहे.

# घरातील सामान शिफ्टिंग करण्याच्या बहाण्याने चोरी

## चौघांच्या टोळीला पोलिसांनी केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : घरातील सामान शिफ्टिंग करण्याच्या बहाण्याने संपर्क करून सामान शिफ्टिंग न करता मौल्यवान सामानाची चोरी करत पळून जाणाऱ्या चारजणांच्या टोळीला वसई गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केली असून तीन गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळाले आहे.

नायगावच्या विजया सोसायटीत राहणारे आशिष महाले (३५) यांनी घराचे सामान शिफ्ट करण्यासाठी बोरिवलीच्या बेस्ट कुरिअर अँण्ड सर्व्हिस एजन्सीच्या चौघांना १९ डिसेंबरला सकाळी साडेअकराच्या सुमारास बोलावले होते. शिफ्टिंगच्यादरम्यान बिल्डिंगखाली आणलेल्या एका बॅगमधील ५० हजार रुपये किमतीचे दोन लॅपटॉप व त्यात ठेवलेले आयसीआयसीआय आणि ॲक्सिस बँकेचे चेकबुक चोरून नेले होते. याप्रकरणी वसई पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास करताना बेस्ट कुरिअर अँण्ड सर्व्हिस एजन्सीमधून संपर्क केलेल्यांचा तसेच सामान पॅकिंग करण्यासाठ आलेल्यांचा मोबाइल बंद असल्याचे दिसून आले. त्यांच्याबाबत अधिक माहिती प्राप्त करून गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी रोशन ऊर्फ अश्वनी पांडे (२०), विपूल मिश्रा (२०) सौरभ यादव (२०) आणि संतोष मिश्र (२६) या चारही आरोपींना मुंबइच्य भांडूप येथून ताब्यात घेतले आहे. त्यांच गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्या त्यांना २३ डिसेंबरला अटक केल्याच माहिती जनसंपर्क अधिकाऱ्यांन सोमवारी दिली आहे.

आरोपींकडून दोन लॅपटॉप, दुचाकी चेकबुक, दोन एलईडी टीव्ही असा १ लाख २० हजारांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींकडून वसई, जे. जे. मार्ग व मानपाडा येथील तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत. य आरोपींनी कल्याण, डोंबिवली, विरार मुंबईसह अनेक ठिकाणी अशाच प्रका सामान शिफ्टिंग करण्याच्या बहाण्या लोकांच्या घरी जाऊन चोरी केल असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याच पोलिसांनी सांगितले.

लोकमत

# शिजान खानला आज न्यायालयात आणणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : अभिनेत्री तुनीषा शर्माच्या आत्महत्येप्रकरणी अटकेत असलेला आरोपी प्रियकर शिजान खान याला उद्या वालिव पोलिस वसई न्यायालयात हजर करणार आहेत.

तुनीषाने मालिकेच्या सेटवरील मेकअप रूममध्ये गळफास घेऊन शनिवारी दुपारी आत्महत्या केली होती. या घटनेनंतर पोलिसांनी प्रियकर शिजान खानला अटक केली होती. त्याला न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. त्याची कोठडी उद्या संपत असल्याने त्याला वसई न्यायालयात पुन्हा हजर करणार आहे. दरम्यान, दोन किंवा तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळण्याची शक्यता आहे.

## 'लव्ह जिहाद'चा अँगल नाही

तुनीषा ही 'अली बाबा' मालिकेचा को-स्टार शिजान खानसोबत काही काळापासून रिलेशनशिपमध्ये असल्याचीही माहिती पोलिसांनी दिली. ब्रेकअपनंतर तुनीषा अस्वस्थ होती. यामुळे २४ डिसेंबरला मेकअप रूममध्ये आत्महत्या केली. आतापर्यंत केलेल्या तपासात लव्ह जिहादचे एकही प्रकरण समोर आले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच शवविच्छेदन आहवालात तुनीषासोबत बळजबरीचे कोणतेही चिन्ह नाही.

Mumbai Main
Page No. 4 Dec 28, 2022
Powered by: erelego.com